## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : ७४७/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.भागचंद दगडू रोकडे,
मु.पो. कसारा, वार्ड नं. ४,
ता.शहापूर, जि.ठाणे

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, परिक्षेत्र कार्यालय डोळखांब, वनविभाग, मु.पो.डोळखांब, ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, परिक्षेत्र कार्यालय डोळखांब, वनविभाग, मु.पो.डोळखांब, ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १३/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २७/१२/२०२१ | ---- | १८/२/२०२२ | ७/३/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२५/७/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १३/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय चंद्रकांत चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी, डोळखांब उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.प्रशांत रमेश निकाळजे, वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण सुधागड पाली अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" डोळखांब वन परिक्षेत्रातील सलग समतल चर खोदण्याचे कामे, एकूण कामे संख्या, काम निहाय प्राप्त निधी खर्च निधी, कम्पार्टमेंट निहाय खर्च, एकूण खर्च, योजनेची तपशिलावर माहितीबाबत व इतर माहिती."*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.७/३/२०२२ रोजी, *"जन माहिती अधिकारी तथा वनपरीक्षेत्र अधिकारी, डोळखांब यांनी अपिलकर्ता यांचे दिनांक १८/२/२०२२ रोजीच्या अर्जातील नमूद माहिती आठ दिवसांत विनामुल्य पुरवून तसे या कार्यालयास कळवावे."* असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय चंद्रकांत चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी डोळखांब ता.शहापूर यांनी त्यांचे पत्र जा.क्र.मा.अ./७०५/सन२०२४.२५, दि.२२/११/२०२४ अन्वये आयोगास असा अहवाल सादर केला की, *"त्यांनी तक्रारकर्ता श्री.भागचंद्र दगडू रोकडे यांना दि.२१/११/२०२४ रोजी त्यांचे कार्यालयात माहिती पुरविणेकामी बोलाविणेत आले होते. त्यानुसार श्री.भागचंद्र रोकडे सदर दिवशी माहिती घेणेकामी आले असता त्यांना त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात दस्तऐवज उपलब्ध करून देण्यात आला. तक्रारकर्ता यांना पुरविण्यात आलेली माहिती पाहून त्यांचे समाधान झाल्याने त्यांनी सदरचे अर्जाबाबत त्यांचे दि.२१/११/२०२४ च्या पत्रान्वये खुलासा सादर केलेला*

*आहे. सदर खुलाशामध्ये त्यांनी सदरचे अर्जाबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसून सदर माहिती अर्ज व अपिलीय अर्ज निकाली काढणेबाबत विनंती केली आहे. यास्तव अर्जदार यांचा सदरचा दिनांकित अर्ज निकाली काढणेत येत आहे. अर्जदार यांनी सादर केलेल्या खुलाशाची छायांकित प्रत यासोबत जोडून सादर करीत आहोत."*

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय चंद्रकांत चव्हाण यांनी आयोगास सादर केलेल्या दि.२२/११/२०२४ रोजीच्या अहवाल पत्रासोबत तक्रारकर्ता यांची स्वाक्षरी असलेल्या खुलाशाची छायांकित प्रत सादर केली आहे. सदर खुलासा जो तक्रारदार श्री.भागचंद्र रोकडे यांनी वनक्षेत्रपाल डोळखांब ता.शहापूर यांना लिहून दिलेला आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, ते दि.२१/११/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत येऊन वनक्षेत्रपाल डोळखांब यांचे कार्यालयात सादर केलेल्या अर्जामधील पाहिजे असलेली माहिती २१/११/२०२४ रोजी समक्ष पाहावयास मिळाली तसेच संबंधित अधिकारी यांचेशी वस्तुस्थितीशी चर्चा करून आपले समाधान झाले दाखल केलेला माहिती अर्ज व अपील अर्ज आपण मागे घेत आहोत त्याबाबत आपली कोणतीही तक्रार नसून आपला माहिती अर्ज व अपील अर्ज निकाली काढण्यात यावा अशी विनंती त्यांनी वनक्षेत्रपाल डोळखांब शहापूर यांना केली आहे.

तक्रारकर्ता यांना सुनावणीदरम्यान त्यांना माहिती प्राप्त झाली का यासंदर्भात विचारणा केली असता आपणास माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी निवेदन केले. त्यांनतर त्यांची स्वाक्षरी असलेले वनक्षेत्रपाल डोळखांब शहापूर यांना लिहीलेले दि.२१/११/२०२४ रोजीचे खुलासा पत्र त्यांचे निदर्शनास आणले. त्यावेळी त्यांनी निवेदन केले की, सदर खुलासा पत्रावरील स्वाक्षरी त्यांची नाही व असे कोणतेही पत्र त्यांनी वनक्षेत्रपाल डोळखांब शहापूर यांना दिलेले नाही.

श्री.भालचंद्र दगडू रोकडे यांच्या निवेदनाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांना सदर वस्तुस्थिती आयोगाकडे लेखी स्वरूपात सादर करण्यास विनंती केली असता, त्यांनी लेखी अर्ज आयोगाकडे सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, आज दि.१३/८/२०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात तक्रार क्र.७४७/२०२२ सुनावणी मध्ये जे आपले लेखी दिलेले पत्र ज्या अधिकारी यांनी सादर केले आहे, ते पत्र माझे नाही व मला कोणतीही माहिती मिळाली नाही.

श्री.भालचंद्र रोकडे (तक्रारकर्ता) यांच्या लेखी अर्जानंतर उपस्थित असलेले विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय चव्हाण यांचेकडून तक्रारकर्ता श्री.भालचंद्र रोकडे यांचेकडे दिलेला खुलासा मुळ प्रत आयोगाने आपल्या ताब्यात घेतली. श्री.भालचंद्र रोकडे हे सदर खुलासा पत्रावरील स्वाक्षरी आपण केलेली नसल्याचे सांगत असल्याने सदर बाब गांभीर आहे. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी जी कागदपत्रे आयोगास सादर केली आहेत ती खरी आहेत किंवा कसे, कारण तक्रारकर्ता यांनी स्वाक्षरी आपले समक्ष केल्याचे श्री.अजय चव्हाण यांनी सदर खुलासा पत्रावर नमूद केले आहे व त्याखाली स्वाक्षरी केली आहे.

या ठिकाणी मुद्दा असा उपस्थित होतो की, तक्रारकर्ता श्री.भालचंद दगडू रोकडे दावा करतात त्याप्रमाणे खरोखर त्यांनी दि.२२/११/२०२४ रोजीच्या खुलासा पत्रावर स्वाक्षरी केली किंवा कसे, आणि जर खरोखरच त्या पत्रावर त्यांची स्वाक्षरी नसेल तर विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय चंद्रकांत चव्हाण, वनक्षेत्रपाल डोळखांब ता.शहापूर जि.ठाणे यांनी आयोगाकडे बनावट कागदपत्रे सादर केली काय हा सुध्दा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. त्यामुळे कागदपत्रांची सत्यतता पडताळणी करून पाहणे आवश्यक आहे. म्हणून आयोगाच्या उप सचिव यांनी संबंधीची रितसर तक्रार सी.बी.डी बेलापूर पोलीस ठाणे येथे दाखल करावी. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सी.बी.डी. बेलापूर पोलीस ठाणे यांना विनंती करावी की, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय चंद्रकांत चव्हाण, वनक्षेत्रपाल डोळखांब ता.शहापूर जि.ठाणे यांनी सादर केलेल्या खुलासा पत्रावर केलेली स्वाक्षरी ही श्री.भालचंद दगडू रोकडे यांचीच आहे किंवा कसे याबाबत खात्री करून घ्यावी व जर ती श्री.भालचंद रोकडे यांची स्वाक्षरी नसेल तर त्यांनी यासंदर्भात योग्य ती कायदेशीर कार्यवाही करून तसा अहवाल आयोगास पुढील सुनावणीस सादर करणेबाबत कळविणे उचित होईल.

तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांचे निवेदन असल्याने, त्यांना माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल डोळखांब यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित

उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे. तक्रारकर्ता यांना जी माहिती पुरविणार त्याची एक प्रत आयोगास पाठवावी.

२. तक्रारकर्ता श्री.भालचंद दगडू रोकडे दावा करतात त्याप्रमाणे खरोखर त्यांनी दि.२२/११/२०२४ रोजीच्या खुलासा पत्रावर स्वाक्षरी केली किंवा कसे, आणि जर खरोखरच त्या पत्रावर त्यांची स्वाक्षरी नसेल तर विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय चंद्रकांत चव्हाण, वनक्षेत्रपाल डोळखांब ता.शहापूर जि.ठाणे यांनी आयोगाकडे बनावट कागदपत्रे सादर केली काय हा सुध्दा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. त्यामुळे कागदपत्रांची सत्यतता पडताळणी करून पाहणे आवश्यक आहे. म्हणून आयोगाच्या उप सचिव यांनी संबंधीची रितसर तक्रार सी.बी.डी बेलापूर पोलीस ठाणे येथे दाखल करावी. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सी.बी.डी. बेलापूर पोलीस ठाणे यांना विनंती करावी की, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय चंद्रकांत चव्हाण, वनक्षेत्रपाल डोळखांब ता.शहापूर जि.ठाणे यांनी सादर केलेल्या खुलासा पत्रावर केलेली स्वाक्षरी ही श्री.भालचंद दगडू रोकडे यांचीच आहे किंवा कसे याबाबत खात्री करून घ्यावी व जर ती श्री.भालचंद रोकडे यांची स्वाक्षरी नसेल तर त्यांनी यासंदर्भात योग्य ती कायदेशीर कार्यवाही करून तसा अहवाल आयोगास पुढील सुनावणीस सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१६/१०/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२५ .

**आदेशातील मुद्दा क्र.२ च्या अनुपालनार्थ प्रत रवाना,**

१) उप सचिव,
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

२) वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
सी.बी.डी.बेलापूर पोलीस ठाणे,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

Comp-३